# महात्मा फुले : 'शेतकऱ्यांच्या असूड' आणि आजच्या शेतकऱ्यांची वास्तवता

डॉ. मानसी दशरथ जगदाळे
मराठी विभाग प्रमुख
आदर्श कॉलेज ,विटा .

## प्रास्तविक

१९६० नंतर मराठी साहित्यामध्ये अनेक वाङ्मयीन चळवळी सुरु झाल्या.त्यातून अनेक वाङ्मयीन प्रवाह निर्माण झाले.ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य आणि आदिवासी साहित्य असे चार प्रवाह मराठी साहित्यामध्ये उदयास आले.ग्रामसंस्कृती आणि कृषिनिष्ठ समाज यांच्या जीवन जाणीवा आणि समस्या ज्या साहित्यात चित्रित होतात ते म्हणजे ग्रामीण साहित्य होय. ग्रामीण साहित्यामध्ये गाव,शेत, शेतकरी, निसर्ग, रुढी-परंपरा,ग्रामीण लोकांच्या समस्या, जीवन, जाणीवा, दुष्काळ, पीकपाणी, शहरी संस्कृतीचे ग्रामसंस्कृतीवर झालेले परिणाम अशा सर्व गोष्टींचे प्रतिबिंब ग्रामीण साहित्यात उमटते.

ग्रामीण साहित्य हे शेतीशी आणि तेथील माणसांशी निगडीत असते. अगदी प्राचीन साहित्यापासून म्हणजे महानुभाव,संतवाङ्मय यामध्येही शेतीचा उल्लेख आलेला आहे. म. फुले यांच्या 'शेतकऱ्याचा असूड','गुलामगिरी','तृतीय-रत्न'(नाटक) यासारख्या साहित्यकृतीतून तत्कालीन शेतकऱ्यांची दयनीय अवस्था समाजासमोर मांडली आहे. खर्या अर्थाने ग्रामीण साहित्याची मुहूर्तमेढ रोवण्याचे महान कार्य म फुले यांनी केले आहे.

## शेतकऱ्यांच्या असूड मधील शेतकऱ्यांची वास्तवता

ग्रामीण भारतातील शेतकरी जनता,त्यांचे प्रश्न त्यांची दुःखे यांना प्रथमत:च वाचा फोडण्याचे काम म. फुलेंनी केले. त्यांच्या अगोदर किंवा त्यांच्या काळातील समाजसुधारकांनी शेतकऱ्यांच्याप्रश्नाकडे लक्ष दिले नव्हते. म. फुले यांनी शेतकऱ्याबद्धल पोटतीडीकीने लिहिले आहे. म. फुलेंच्या काळापूर्वी शेतकरी दैन्यावस्थेतच जगत होता. फुलेंच्या काळातही दैन्याअवस्थेतच होता आणि आजच्या काळातही दैन्याअवस्थेतचआहे. शेतकऱ्यांचे शोषण,त्यांचे अज्ञान आणि त्यांच्यावरील उपाय या अनेक बाबींचा समावेश फुलेंनी आपल्या शेतकऱ्यांचा असूड या ग्रंथात केला आहे. हा ग्रंथ प्रामुख्याने मध्यम व कनिष्ठ प्रतीच्या शेतकऱ्यांची दुःखे प्रकट करणारा आहे. शेतकरी अशिक्षित असल्यामुळे त्याला दुःखाला सामोरे जावे लागत आहे. याबद्दल म. फुले म्हणतात "विद्येविना मती गेली,मतीविना नीती गेली, नितीविना गती गेली ,गतीविना वित्त गेले,वित्तिविना शुद्र खचले ,इतके अनर्थ एका अविद्येने केले"केवळ एका अविद्येमुळे किती अनर्थ घडतात हेच म. फुलेंना सांगायचे आहे. भटा-ब्राम्हणांनी शूद्रांच्या शिक्षणाला विरोधच केला किंवा शिक्षण दिलेच तर त्यातून त्यांचे शोषण होईल असेच द्यायचे, हीच त्यांची मानसिकता होती.

म. फुले म्हणतात शेतकऱ्याच्या जन्मापासून ते मृत्युपर्यंत ग्रामव्यवस्थेतील उच्चवर्णीय ब्राम्हण शेतकऱ्यांचे शोषण करतात,त्यांचा द्वेष करतात,त्यांना दुय्यम दर्जाची वागणूक देतात ,तुच्छ लेखतात परंतुस्वत:मात्र अनेक गैरकृत्ये करत असतात. अनेक ब्राम्हणांचा बाहेरख्यालीपणा असतो. या सर्वांचे वर्णन कोणाचाही मुलाहिजा न ठेवता अत्यंत कठोर भाषेत केले आहे. त्यांनी ब्राम्हणाचा उपहास केला आहे. तसेच एकापेक्षा जास्त बायका करणाऱ्या शेतकऱ्यांचाही त्यांनी खरपूस समाचार घेतला आहे उदा.

“तथापि त्यांनी एका मागे एक, दोन, तीन, चार, पाटाच्या बायका कराव्यात या जुलमी न्यायाला म्हणावे तरी काय ? माझ्या मते त्यांनी पाचवी पाटाची बायको करावी म्हणजे, त्याचे मढ्यापुढे गाडगी धरण्याच्या पेचातून त्याची मुले मुक्त होतील. ” ? अशा पद्धतीने म. फुलेंनी शेतकऱ्यांचा जसा उपहास केला आहे. तसाच त्यांच्याबद्दल करूणाही व्यक्त केली आहे. उदा. शेतकरी जेव्हा कर्जबाजारी होतो तेव्हा मुलीच्या अंगावरील दागिने विकतो, त्यामुळे मुलीचे नांदणे कठीण होते. तसेच शेतकऱ्याला पोटभर अन्न मिळत नसल्याने तो फक्त पाणी पिऊन ढेकर देतो, किंवा एकाद्या लग्नसमारंभात शेतकऱ्याची मुले आधाशासारखी जेवत असतात.या सर्व वर्णानातून शेतकऱ्याबद्दल असणाऱ्या करुणेचा प्रत्यय येतो. शेतकऱ्यांच्या घरी अठराविश्व दारिद्र असते, याचे चित्रणही फुलेंनी केले आहे. हे वर्णन करताना त्यांनी अनेक ठिकाणी बोलीभाषेचा किंवा ग्रामीण भाषेचा अवलंब केला आहे उदा. मुकुंदाच्या आईची जमीन सावकाराने स्वतःच्या नावावर केल्यानंतर आई आजारी पडते आणि तापात सतत बडबडत असते. “कनगीतलं दानं इकून म्या भटा बामानांच्या पंक्ती उठवल्या. तो मेला रामभट त्याचा डोला उठवला. तो म्हणाला, म्हणून म्या सत्यनारायण घातला त्या मेल्याला सत्यनारायणाची किर्डी पाजळली. साडेसाती घालवाय पायी बामन पूजेला बसवले, पण तुला काय दया येईना.” अशा पद्धतीने मुकुंदाची आई देवाला शिव्या घालत होती, देवाचा तिरस्कार करत होती. अशा रीतीने शेतकऱ्यांचा छळ सर्वच बाजूने कसा होत होता, याचे चित्रण म. फुलेंनी केले आहे. शेतकऱ्यांची जी स्थिती शेतीसंबंधी होती, तीच स्थिती त्याची शिक्षणाविषयी होती. शेतकरी शिक्षित नसल्याने त्याच्या अज्ञानाचा फायदा सर्वत्र घेतला जात होता. उदा. एखाद्या शेताच्या कामाबद्दल किंवा भाऊबंदकीत सामाईक विहरीवर असलेल्या पाण्याच्या पाळीवरून भांडणे होत असतील तर, इथेही शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेतला जातो आणि त्यांच्यावर अन्याय केला जातो.तसेच सोवळे व अहिंसक समजणाऱ्या सावकारापासून कुटुंबवत्सल,अज्ञानी,भोळ्या,अक्षरशून्य शेतकऱ्यांना कर्ज देताना अनेक प्रकारे नुकसान करतात म. फुले म्हणतात, “आस्मानी सुलतानी मुळे दुष्काळामुळे तसेच टोळांच्या तडावऱ्यापासून होणारे नुकसान केव्हातरी भरून येते. एकंदर सर्व लहानमोठ्या सरकारी खात्यात बहुतेक युरोपिअन कामगार ऐषआरामात गुंग असल्या मुळे त्या सर्व खात्यात भट पडून ते कोकणातील ब्राम्हण खोटा सारखे सर्व अक्षरशून्य शेतकऱ्यांचे जे नुकसान करतात,ते कधीही भरून येण्याची आशा नसते.”रात्रंदिवस शेतात खपणाऱ्या कष्टाळू अज्ञानी शेतकऱ्यांच्या कंगाल आणि दिनवाण्या स्तिथीविषयी म. फुले यांनी अत्यंत मोजक्या शब्दात वर्णन केले आहे. लेकीचे दागिने मारवाड्याकडे घाण ठेवल्यामुळे सासरची माणसे तिला नांदवित नाहीत. तसेच शेतकऱ्यांकडे शेतसारा देण्यासाठी पैसे नाहीत याचे वर्णन म. फुलेंनी अतिशय योग्य शब्दात केले आहे. ते म्हणतात, “बैल विकून जर शेतसारा द्यावा,तर पुढे शेतकी कोणाच्या जीवावर ओढावी? व्यापार दंड करावा तर मला पोट भरण्यापुरता काही हुन्नर ठाऊक नाही. कण्हेरीच्या मुळ्या मी वाटून प्याल्यास कर्तीधर्ती मुले आपली कशीतरी पोटे भरतील. परंतु मला जन्म देणाऱ्या वृद्ध बयेस व बायकोसह माझ्या लहानसहान चिटुकल्या लेकरांस अशा वेळी कोण सांभाळील? त्यांनी कोणाच्या दारात उभे रहावे?त्यांनी कोणापाशी आपले तोंड पसरावे?” शेतकऱ्यांचे शोषण पाहून अस्वस्थ झालेल्या म.फुलेनी ‘शेतकऱ्यांचा असूड’ हा ग्रंथ लिहिला.या ग्रंथाच्या माध्यमातून शोषण व्यवस्थेवर असुडाचे फटकारे मारले आहेत. म. फुलेंनी ग्रामीण भागातील कृषिजीवानाचा अभ्यास करून शेतकऱ्यांचे प्रश्न समजून घेतले होते त्यामुळे शेतकरी आणि शेतमजुरांचा आक्रोश ऐकून फुले व्यथित झाले होते. शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेला जबाबदार असणाऱ्या घटकावर त्यांनी जोरदार टीका केली, त्याचबरोबर त्यांनी शेतकऱ्यावरही उपहासात्मक टीका

केली आहे. शेतकऱ्याच्या दैन्यावस्थेला भट-ब्राम्हण, सावकार-मारवाडी आणि सरकारी खात्यातील लोक कारणीभूत असली तरी शेतकरी स्वतःही या परिस्थितीला कारणीभूत आहे. जर शेतकरी शिकून संघटीत झाला तर, त्याला आपल्या सामर्थ्याची ओळख होईल आणि संकटाला धैर्याने सामोरे जाईल, अशी भूमिका म. फुलेंनी शेतकऱ्यांच्या असूड मध्ये मांडली आहे शेतकऱ्यांची अशी अवस्था त्या काळीहि होती आणि आजही आहे. यामध्ये फारसा बदल झालेला आहे असे नाही.आज जमिनीचे अनेक तुकडे पडल्यामुळे एकर, दोन एकर जमीन काही शेतकऱ्यांच्या नावावर आहे, त्यामुळे जीरायीत जमीन असेल तर निसर्गाच्या लहरीवर शेतातील पिके अवलंबून असतात. त्यातूनही चांगले पिक आलेच तर व्यापारी दर पाडतात. शेती बागायती असेल तरीही अशीच अवस्था होते. प्रचंड कबाडकष्ट करून पिक पिकवायचे आणि विक्रीच्या वेळी त्या पिकाचा दर पडलेला असतो. त्याच्या शेतातील माल नाशवंत असल्यामुळेत्याचा साठा करता येत नाही. सर्वच शेतकऱ्याकडे साठा करण्यासाठी साधनसामग्री नसते,त्यामुळे येईल त्या भावाने त्याला सगळा माल विकावा लागतो. अशा पद्धतीने शेतकऱ्यांचे सगळीकडून शोषण होत असते. कधी-कधी तर त्याची अशी अवस्था होते की,शेतात घातलेले भांडवलही त्याला मिळत नाही,उलट त्यालाच जवळचे पैसे घालावे लागतात.

शेतकऱ्याला 'शेतकरी राजा', 'बळीराजा'असे संबोधले जाते. तसेच शेतकरी हा सर्व 'जगाचा पोशिंदा असतो असे म्हटले जाते. तेही एका परीने योग्यच आहे,कारण शेतात काबाडकष्ट करून पिकविलेला माल जेव्हा तो विक्रीस पाठवितो,तेव्हा त्याच्याकडून वाहतूकभाडे,आडत,हमाली व इतर कर घेतले जातात. त्याच्या मालामध्ये काटामारला जातो. म्हणजे एका परीने वरील सर्व घटकांचे पोषण करण्याची जबाबदारी शेतकऱ्यांची असते,कारण तो सर्व जगाचा पोशिंदा असतो. या सर्वांची देणी भागवून मालाला योग्य भाव असेल तर त्याच्या हातात त्याच्या घामाचे पैसे पडतात. मालाला दर नसेल तर सर्वांचे देणे भागविण्यासाठी त्याला जवळचे सर्व पैसे खर्च करावे लागतात. बघा शेतकऱ्यांना मिळणारा न्याय किती अजब आहे. त्याचाच माल असून,त्यालाच सर्वांची जबाबदारी घ्यावी लागते. आपण एखाद्या ज्वेलरीमध्ये गेलो आणि एखादा दागिना घेतला तर दुकानदार आपणाकडून दराव्यतिरिक्त मजुरी घेतो,टॅक्स घेतो आणि आपण ते आनंदाने देतो. म्हणजे इथे दुकानदाराला शेतकऱ्याप्रमाणे त्याचा माल विकायचा आहे पण,शेतकऱ्यांचा माल नाशवंत असल्यामुळे तो फार दिवस टिकत नसल्यामुळे तो कमी किंमतीत घेतला जातो. म्हणजे आज अशिक्षित,अज्ञानी शेतकऱ्याला कोण फसवत नाही तो आळशी अशी अवस्था झालेली आहे. माणसांची फसवणूक कमी पडते कि काय म्हणून निसर्गही त्याला फसवत असतो. आज दुष्काळामुळे साळ्यात जास्त भीषण अवस्था कुणाची होत असेल तर, ती म्हणजे शेतकऱ्यांची. कारण शेतकऱ्याकडे शेती असते,जनावरे असतात. आणि या दोन्ही घटकांना पाण्याची गरज असते. म्हणून पाणीच नसेल तर,हे दोन्हीही घटक वाचणार नाहीत आणि हे दोन्हीही घटक वाचले नाहीत, तर शेतकरी वाचणार नाही आणि शेतकरी वाचला नाही, तर देश वाचणार नाही. म्हणून शेतकऱ्याला वाचविणे गरजेचे आहे.

राजन गवस यांच्या 'ब,बळीच्या' कादंबरीत सध्याच्या शेतकरी जीवनाचे वास्तव चित्रण आले आहे."शेतकरी जीवन हे कृषि संस्कृतीशी संबंधित आहे,तो कृषिउद्योग नाही, ती कृषी संस्कृती आहे.उद्योग व संस्कृती यातील सीमारेषा कथाकथनात स्पष्ट होत जाते. सबंध कादंबरीत शेतीनिष्ठ जीवनशैली चित्रित झाली आहे. आजच्या काळात जे-जे म्हणून बरं वाईट जीवनशैलीत आहे, ते जसच्या तस उलगडत जाते. सहकारातील जीवघेणं राजकारण, परस्परातील हेवेदावे, त्यामुळे निर्माण होणाऱ्या हाणामाऱ्या व तंटे, कोर्टकचेऱ्या, पोलिसांचा हस्तक्षेप, खेळखंडोबा करणारे शिक्षण, शेतकरी संघटनेचे

हरवलेपण, प्रत्येकाला भौतिक सुखाचे असलेलं आकर्षण, कुटुंबात आणि समाजात वावरताना प्रत्येकाच्या वाट्याला आलेलं तुटलेपण, पैशाच्या राजकीय सत्तेच्या आधारे साधलेला स्वार्थाचा कळस,भ्रष्टाचारानं बरबटलेलं सर्व स्तरावरच प्रशासन, प्रशासनातील कर्मचाऱ्यांतील पशुवत निबरपना, गरीब असहाय, निराधार महिलांची आगतिकता, असे खूप काही या कादंबरीत एकत्र झाले आहे.”

मानवनिर्मित आणि निसर्गनिर्मित संकटामुळे आज शेतकरी अडचणीत आलेला आहे. अशा परिस्थितीमुळे तो कर्जबाजारी झालेला आहे. कर्जबाजारीपणामुळे तो आत्महत्या करतोय. आत्महत्या करून तो एकटा या सर्व संकटांपासून सुटतो पण,बायको आणि मुलांची काय अवस्था होत असेल,याचा विचार त्याने कधी केला आहे का? या सर्व परिस्थितीवर आत्महत्या हा उपाय नाही. आत्महत्या हे भ्याडपणाचे लक्षण आहे. आज शेती करणाऱ्या अनेक तरूण मुलांची लग्ने होत नाहीत, कारण तो मुलगा शेती करतोय. शेतकरी आहे. उद्या लग्न झाल्यांनतर मुलीला रोज शेतात काम करावे लागेलया भीतीने कित्येक मुली किंवा त्यांचे आईवडील शेतकरी स्थळाला नकार देतात. अशी स्थिती आजच्या शेतकरी मुलांची आहे मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे,त्यामुळे साहजिकच प्रत्येक मुलीला जोडीदार हा सरकारी नोकरदारच पाहिजे. शेतकरी जोडीदार कुणालाच नको आहे. वाढत्या बेरोजगारीमुळे तरुणांना नोकरी मिळेना,त्यामुळे त्यांनाशेतीशिवाय पर्याय नाही. शेती केली तर वरील सर्व प्रकार त्यांच्या बाबतीत घडत असतात,त्यामुळे आजचा शेतकरी सर्वच बाजूने अडचणीत येत आहे. पिढ्यानपिढ्या तो दबलेलाच आहे. याचे चित्रण आपणास म. फुलेंच्या ‘शेतकऱ्याचा असूड’मध्येही दिसते आणि आजही दिसते हेच खरे.

**संदर्भ ग्रंथ**

१) नागनाथ कोतापल्ले शेतकऱ्यांचा असूड–संपादन व प्रास्तवना
२) तत्रैव
३) तत्रैव
४) तत्रैव
५) सं. शरयू आसोलकर– ब,बळीचा विषयी पृ.१६१